# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २९८/२०२४ दिनांक- १३/०८/२०२४.

## "ट्रान्सफार्मर मधुन कॉपर व ऑईल चोरी करणाऱ्या सराईत टोळीला अटक करण्यात पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश"

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २२/०७/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. ते दिनांक २६/०७/२०२४ सायंकाळी ०५.०० वा.चे दरम्यान सागर कंपाऊन्ड, पेल्हार गाव, ता.वसई जि.पालघर या ठिकाणी असलेल्या ट्रान्सफॉर्मर च्या बाजुला लावलेली लोखंडी जाळे कट करुन त्यावाटे आत प्रवेश करुन ट्रान्सफॉर्मरच्या आत मधील एकुण ६,९९,०००/- रुपये किंमतीचा ट्रॉन्सफॉर्मर मधील कॉपर व ऑईल असा मुद्देमाल चोरी करुन चोरुन नेलेबाबत फिर्यादी - श्री. असीम अरिफ नंदोलिया वय - ४१ वर्षे, व्यवसाय - दुध व्यवसाय, रा.ऐ/९०४, लोधा बॅलऐर, जोगेश्वरी पं.मुंबई यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन दिनांक २७/०७/२०२४ रोजी १९.०३ वा. गुन्हा रजि. क्र. I ६१६/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (ए) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे गांर्भीर्य लक्षात घेऊन पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी, यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना गुन्हा उघडकिस आणुन आरोपीतांना अटक करण्याच्या सुचना दिल्या होत्या. गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ सदर गुन्हयाचे घटनास्थळाला भेट देवुन परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचे तपासणी करत असतांना दिनांक २३/०७/२०२४ रोजी रात्रौ ०२.०० वा. च्या सुमारास घटनास्थळाजवळ एक लाल रंगाची कार व ०४ इसम यांनी येऊन चोरी करुन जात असतांना दिसुन आले. सदर कारचा गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या मार्फत पेल्हार ते शिळफाटा असा पाठलाग करुन आरोपीत यांचा सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे शोध घेत असतांना सदर गुन्हयातील आरोपीत निष्पन्न करुन सदर गुन्हयातील आरोपीत ०१) अनिस वारीसअली मोमिन, वय २४ वर्षे, रा. भिवंडी ता. जि. ठाणे, २) **अब्दुलसकुर मोहम्मद याकुब खान वय २६ वर्षे**, रा. दहिस मोरी, मुंब्रा जि.ठाणे, ३) जयशंकर नंदारामजी श्रीमाली वय ६४ वर्षे, रा. भांडुप प. मुंबई, ४) मोहम्मद समीर वकील अहमद मोमिन, वय ४२ वर्षे, रा. शिळडायघर मुंब्रा जि. ठाणे यांना गुन्हयाचे तपास कामी शिळडायघर, जि. ठाणे व लखनऊ राज्य उत्तरप्रदेश येथुन ताब्यात घेऊन त्यांच्याकडे तपास करता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली असुन आरोपीत यांच्याकडुन सदर गुन्हयात चोरीस गेलेल्या मालापैकी ३८० किलो वजनाचे ३,८०,०००/- रुपये किंमतीचे कॉपर हस्तगत करण्यात आले आहे.

**सदर आरोपीत यांचे कडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकिस आले आहे.**

| | | |
|---|---|---|
| १ | पेल्हार पोलीस ठाणे | गु.र.क्र. ६१६/२०२४ भा. न्या. सं. कलम ३०५ (ए) प्रमाणे. |
| २ | पेल्हार पोलीस ठाणे | गु.र.क्र. ७३२/२०२३ भा.द.वि.स कलम ३७९ प्रमाणे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | शिवाजीनगर पोलीस ठाणे, अंबरनाथ पुर्व ठाणे शहर. | गु.र.क्र. ५८०/२०२४ भा.द.वि.स कलम ३७९ प्रमाणे. |

सदर आरोपीत यांचे विरुध्द **कॉपर चोरीचे इतरत्र** गुन्हे दाखल असुन आरोपीत यांनी अंबरनाथ, डोंबीवली, तळोजा, येथे देखील ट्रान्सफार्मरमधील तांबे व ऑईल चोरी केले असल्याचे तपासात सांगितले आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शकील शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मीक पाटील, मिथुन मोहिते पो.अं./रवि वानखेडे, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अभिजित नेवारे, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**--------------0000-------------**